# १२.

# महाराष्ट्र पशु व मत्स्य विज्ञान विद्यापीठ, नागपूर

पशुसंवर्धन माहिती पुस्तिका

# १२. महाराष्ट्र पशु व मत्स्य विज्ञान विद्यापीठ, नागपूर-०१

राज्यातील पशुसंवर्धनाचा विकास करण्याच्या दृष्टीने महाराष्ट्रातील चारही कृषि विद्यापीठातून पशुवैद्यकीय व दुग्धतंत्रज्ञान महाविद्यालये तसेच पशुपैदास प्रक्षेत्रे एकत्रित करून महाराष्ट्र पशु व मत्स्य विज्ञान विद्यापीठाची स्थापना दिनांक ०३ डिसेंबर, २००० रोजी करण्यात आली.

विद्यापीठाचे मुख्यालय नागपूर असून कार्यक्षेत्र संपूर्ण महाराष्ट्र आहे. विद्यापीठांतर्गत पाच पशुवैद्यकीय महाविद्यालये एक स्नातकोत्तर पशुवैद्यक संस्था लोकाभिमुख असून शेतकऱ्यांशी नियमित संपर्कात आहे व त्यांच्याकरिता विविध विषयांवर प्रशिक्षणे व शिबीरांचे आयोजन करण्यात येते. विद्यापीठात राज्यशासन तसेच केंद्रशासन पुरस्कृत जवळ-जवळ ४० कोटी रुपयाचे संशोधन प्रकल्प शेतकऱ्यांच्या हितासाठी राबविले जात आहे. आज स्थितीत विद्यापीठात पदांची स्थिती खालीलप्रमाणे आहे.

| अ. क्र. | संवर्ग | पद संख्या |
|---|---|---|
| १ | पशुविद्या शाखा शिक्षकवर्गीय पदे | ४७४ |
| २ | दुग्ध तंत्रज्ञान शाखा शिक्षकवर्गीय पदे | ३३ |
| ३ | मत्स्य विज्ञान शाखा शिक्षकवर्गीय पदे | ३६ |
| ४ | शिक्षकेतर पदे | १४७७ |
| | **एकूण** | **२०२०** |

**१. महाराष्ट्र पशु व मत्स्य विज्ञान विद्यापीठ :-**

महाराष्ट्र शासनाने महाराष्ट्र पशु व मत्स्य विज्ञान विद्यापीठ स्थापन करण्याचा निर्णय घेतला १ एप्रिल २००० पासून नागपूर (सेमीनरी हिल्स, नागपूर-४४००६) येथे विधीमंडळातील प्रस्ताव क्र. ७ अन्वये विद्यापीठ स्थापनेस सभागृहाने मान्यता दिलेली आहे. दिनांक ३ डिसेंबर २००० रोजी सदर विद्यापीठाचे औपचारिक उदघाटन करून कामकाज सुरूवात झालेली आहे. महाराष्ट्र पशु व मत्स्य विज्ञान विद्यापीठ, नागपूर संबंधित पत्र व्यवहार या कार्यासनाकडुन हाताळला जातो.

भारतीय पशुवैद्यक परिषद याबाबतचा पत्रव्यवहार पाहिला जातो.

**या विद्यापीठाच्या अधिनस्त खालील संस्था/महाविद्यालये कार्यान्वित आहेत.**

१. मुंबई पशुवैद्यकीय महाविद्यालय, मुंबई.
२. पशुवैद्यक व पशुविज्ञान महाविद्यालय, परभणी.
३. पशुवैद्यक व पशुविज्ञान महाविद्यालय, उदगीर, जिल्हा लातूर
४. क्रांतीसिंह नाना पाटील पशुवैद्यक, शिरवळ, जिल्हा सातारा.
५. नागपूर पशुवैद्यक महाविद्यालय, नागपूर.
६. स्नातकत्तोर पशुवैद्यक व पशुविज्ञान संस्था, अकोला.
७. मत्स्यव्यवसाय महाविद्यालय, शिरगाव.
८. दुग्धव्यवसाय तंत्रशास्त्र महाविद्यालय, वरुड, ता. पुसद जि. यवतमाळ.
९. गो-संशोधन केंद्र, इगतपूरी, जिल्हा नाशिक.
१०. गो-संशोधन केंद्र, राहूरी, जिल्हा अहमदनगर.
११. चारा संशोधन केंद्र, पालघर, जिल्हा ठाणे.
१२. मेंढी व बकरी संशोधन केंद्र, राहूरी, जिल्हा अहमदनगर.
१३. तारापूरवाला सागरी जीवशास्त्रीय संशोधन केंद्र, मुंबई.
१४. सागरी जीवशास्त्रीय, रत्नागिरी.
१५. मत्स्य व्यवसाय विषयक संशोधन केंद्र, अकोला.
१६. खारजमीन संशोधन केंद्र, पनवेल, जिल्हा रायगड.
१७. दुग्धव्यवसाय विज्ञान संस्था, मुंबई
१८. महाराष्ट्र पशु व मत्स्यविज्ञान विद्यापीठ, नागपूरचे उपकेंद्र उदगीर येथे महाराष्ट्र राज्य पशुवैद्यकीय परिषद, नागपूर येथे स्थापन. (२००१)